72

**ISSN 0976-0377**

RNI. MAHMUL02805/2010/33461

International Registered & Recognized
Research Journal Related To Higher Education for all Subjects

INTERLINK RESEARCH ANALYSIS

IRA

# INTERLINK RESEARCH ANALYSIS

**Editor In Chief**
**Dr. Balaji Kamble**

RNI. MAHMUL02805/2010/33461
Interlink Research Analysis
IMPACT FACTOR 6.20
ISSN 0976-0377
Issue:XXIV, Vol. V, July 2021 To Dec.2021

# INDEX



| Sr. No | Title for Research Paper | Page No |
|---|---|---|
| 1 | Analysis of heavy metals concentration in soil around the Tapti river<br>**Dr. N. H. Awade** | 1 |
| 2 | To Study the impact of Sovereign wealth fund on Indian Economy and its Challenges and Opportunities for India in Economic Development<br>**D. C. Pawar** | 7 |
| 3 | Role of Financial Inclusion for Sustainable Growth in India<br>**R. B. Bhandwalkar** | 19 |
| 4 | A Study of English Proverb in Language and Literature<br>**V. S. Bhutekar** | 26 |
| 5 | Oocytes Development In Lamellidens marginalis Due to Nero-endocrine manipulation during Summer Season<br>**Dr. P. R. Gaikwad** | 31 |
| 6 | मंजुल भगत के उपन्यास तथा कहानियो में नारी जीवन : एक अध्ययन<br>**डॉ. तुकाराम वैजनाथ चाटे** | 39 |
| 7 | कृषी क्षेत्रातील विविध बदल व समस्या यांचा - एक भौगोलिक अभ्यास<br>**डॉ. व्ही. टी. नाईक** | 44 |
| 8 | केशवसुताची कविता : एक चिकित्सक अभ्यास<br>**गणेश लहाने** | 49 |
| 9 | आंतरमहाविद्यालयीन मैदानी स्पर्धेत सहभागी खेळाडूंच्या आक्रमकतेचा अभ्यास<br>**डॉ. सीमा एस. सबनीस** | 53 |

# केशवसुताची कविता : एक चिकित्सक अभ्यास

**गणेश लहाने**
मराठी विभाग प्रमुख,
दयानंद वाणिज्य महाविद्यालय,
लातूर, जि. लातूर

8 Research Paper - Marathi

आधुनिक कवितेचे जनकत्त्व ज्यांना जाते ते केशवसुत केशवसुतांच्या आधीची कविता ही संत, पंत, तंत या स्वरुपाची होती. संत वाङ्मयामध्ये नर स्तुती वर्ज्य होती स्तुती करावी परमेश्वराची करु नये या शुद्र नराची' हरिकथा परोपरीने कथन करणे, चिंतन करणे ईश्वर हा एकच साध्य या कवितेचा होता. सर्व उत्तमाकडे जाणारी, नैतिकता उत्तम लक्षणांची युक्त साधा-सोपा नामस्मरणाचा भक्तिमार्ग या कवितेने दिला. तर पंडित कविनी रामायण, महाभारत यातील कथाना संस्कृतचा साज चढवून आपले पांडित्य दाखविले. याही कवितेचा विषय ईश्वर हाच होता. या नंतरची कविता तंत म्हणजे शाहिरी कवी, पोवाडे व लावण्या गण, गवळणी, भूपाळ्या याही कवितांचा विषय ईश्वर गण- गवळणी, भूपाळ्या मधून ईश्वरच होतो. पोवाड्यामध्ये मात्र स्तुती वर्णने आलेली आहेत, ती एकतर राजाची किंवा त्यांच्या पराक्रमाची, लढायांची तर लढाईवर गेलेल्या या सैनिकाला किंवा मुलुखगिरीवर गेलेल्या मुशाफिराला करमणूक म्हणून लावण्याची रचना केलेली आढळते. शाहीरानी लावण्यामध्ये स्त्रियांच्या सौंदर्याची वर्णन आलेली आहेत.

यानंतरचा कालखंड म्हणजे केशवसुतांचा होय. केशवसुतांनी अनेक विषयांवर कविता रचल्या माणूसही कवितेचा विषय होऊ शकतो हे केशवसुतांनी प्रथम आपल्या काव्याद्वारे समाजासमोर मांडले. त्यांनी निसर्गवर्णनपर, सामाजिक, काव्यविषयक, गुढगंजनपर, राजकीय व ईश्वर विषयक कविता रचल्या याआधी इतकी विषयांची विविधता असणारी कविता रचल्या गेली नव्हती. सामाजिक जाणिवा व्यक्त करणाऱ्या कविता ही या आधी कोणी लिहिल्या नव्हत्या. केशवसुत म्हटले की, 'तुतारी', स्फूर्ती, नवा शिपाई, इ. कविता दिसून येतात. या सामाजिक कवितेमध्ये केशवसुतांनी पाश्चात्य सुधारणावादी विचारांना प्राधान्य देऊन तिकडील विचारसरणी आपल्या इथे यावी यासाठी त्यांनी आपल्या काव्यप्रकाराचा वापर केला. नवविचारांनी प्रेरित झाल्याने आपल्या देशातही विचारांचे

RNI. MAHMUL02805/2010/33461 IMPACT FACTOR 6.20 ISSN 0976-0377
Interlink Research Analysis Issue : XXIV, Vol. V, July 2021 To Dec. 2021 

लोकमत तयार व्हावे व लोक प्रगतीस बाधक आहे त्याचे उच्चाटन व्हावे व नव्याचा स्वीकार करावा व स्वातंत्र्य, समता, बंधुता या तत्वांचा उद्घोष व्हावा ही त्यांची भूमिका होती.

केशवसुतांनी ज्या सामाजिक जाणिवेच्या कविता लिहिल्या त्यामध्ये 'मजुरांवर उपासमारीची पाळी', अंतजाच्या मुलाचा पहिला प्रश्न, नवाशिपाई, तुतारी, स्फूर्ती, गोफण इ.कवितांना अग्रक्रम देता येईल. याच कवितांमधून त्यांनी क्रांतिकारी विचार मांडलेत.

'मजुरांवर उपासमारीची पाळी' या कवितेत प्रथमतःच त्यांनी आर्थिक विषमतेवर बोट ठेवले. तसेच अंतजाच्या मुलाचा पहिला प्रश्न यात कवीने अस्पृश्यतेवर कोरडे ओढले. एवढेच नाही तर आई-वडिलही मुलांना हीच हीन भावना शिकवतात याचा धिक्कारही केला. 'स्फूर्ती' या कवितेमधून आपले बंडखोर विचार मांडलेले आहेत. 'रुढी विरुद्ध लढा', अडवतील देव जरी झगडू त्यांच्याशी निकरी मारा किंवा लढत मरा, सत्वाचा उदयोस्तु करा, कारण पद्य पंक्तीची तरफ आमुच्या करी विधीने दिली असे, यामुळेच आम्ही समाजामधील अनिष्ठ रुढी, परंपरा नष्ट करु असा आत्मविश्वासही दिसून येतो.

'तुतारी' या कवितेमधून सुधारणेचे उच्च शिखर गाठले आहे. त्यात त्यांनी समतेचे तत्व व मानवतावादाचा पुरस्कार केला आहे. या कवितेचे महत्त्व एवढे की त्यातून त्यांना निद्रिस्त समाजाला जागे करण्याकरिता आवाज मोठा हवा म्हणून एखाद्या कर्कश वाद्यांची आवश्यकता त्यांना होती. त्यासाठीच त्यांनी 'तुतारी' पसंत केली. समाजातील

**जुने जाऊ द्या मरणालागुनी, जाळुनी किंवा पुरुनी टाका,**
**सडत न एक्या ठायी ठाका, सावध ऐका पुढल्या हाका**
**प्राप्तकाल हा विश्वाल मधुर, सुंदर लेणी तयात खोदा,**
**मिजनामे यावरती नौदा, बसुनी का वाढविता मेदा?**
**विक्रम काही करा, चला तर?**
**शूरांनो ! या त्वरा करा रे ! समतेचा ध्वज उंच धरा रे !**
**नीतीची द्वाही पसरारे तुतारीच्या ह्या सुराबरोबर.**

या व अशाच काही कवितांमधून काही विचार त्यांनी सुधारण्याची बाजू उचलून धरली सर्वसामान्य त्या विरुद्ध पेटून उठले त्यामुळेच तुतारी ही कविता विशेष महत्त्वाची मानली जाते.

"गोफण" या कवितेत तर केशवसुत अनिष्ट प्रवृत्तीशी कठीण शब्दांच्या धोंड्यानेच हाणामारा करण्यास सिद्ध झाले. म्हणूनच कवी शेवटी म्हणतात कठीण शब्द या धोंड्यांनी करितो हाणहाण !.

केशवसुतांच्या राजकीय कवितांमध्ये 'गोष्टी घराकडील मी वदता', 'एका भारतीयाचे उद्‌गार' या कवितांमध्ये कवी प्रत्येक शब्दातून जो सुधारणेचा आवेग धरला, आग्रह धरला तसा आवेग

आढळून येत नाही. तरी पण राजकीय कविता काही विचार व्यक्त होतात. 'गोष्टी त्यातून त्यांचे देशकार्य करुन घेण्याची इच्छा होती हे स्पष्ट होते.'

**बापू गड्या ! तू ध्वज उभारशील काय ?**
**तु देशकारण करु शकतील काय ?**
**बापु, जनात दिवटी धरशील काय ?**
**स्वातंत्र्यदेव मनसा भजीशील काय ?**

हाच आशय गावी गेलेल्या या मित्राची खोली लागलेली पाहून याही कवितेमधून मांडला आहे. तसेच 'एका भारती यांचे उद्धार' या कवितेत त्यांनी दु:खाचा भोगच भोगला पाहिजे असा विचार केला. तसेच देवा केव्हा परवशपणाची निशा ही सरुन राष्ट्रत्वाला फिरुन आमचा देश येईल केव्हा ! यातून स्वातंत्र्य विषयाची तळमळ व्यक्त केले आहे. म्हणजे राजकीय कविता जरी कमी असल्या तरी केशवसुतांच्या समग्र काव्यात त्याचे एक वेगळेच महत्त्व आहे.

तत्त्वचिंतनपर/गुढगुंजनपर कविता -

केशवसुतांनी लिहिलेल्या तत्त्वचिंतन पर कवितांचा अर्थ लावणे फारच बिकट आहे. कारण केशवसुतांच्या अशा तत्त्वचिंतन पर कविता थोड्या जरी असल्या तरी त्यातून अनेक विध आशय जन्म घेऊ शकतात. यामध्ये प्रामुख्याने' कोठे जातोस झपूर्झा, हरवले श्रेय, तुझे नाम मुखी या कविता महत्त्वाचे आहे.

'झपुर्झा' ही कविता अतिशय प्रसिद्ध आहे. या कवितेचे स्वरुप गुंढगुंजनात्मक आहे. तसेच तिचा पद्य प्रकारही वेगळा वाटतो. सामान्य जीवनातील हर्ष, शोक मिटून जे पुढे जातात तेच खरे जीवनातील गुढे उकलू शकतात, आणि ही अवस्था त्यांना लाभली तोच मग त्यात तल्लीन जातो. त्याला नवनवीन माहिती सुचते. पण तन्मयता मिळवायची कशी असे त्यातून सांगितले आले नसून झपूर्झा गडे झपूर्झा' हा केवळ मंत्र सांगितला ती एक तल्लीन अवस्था आहे. येथे सर्व हर्ष, शोक, हास्य, अश्रू, नष्ट झाले. कुणाचे भय नाही, काट्यांचे बोचणे नाही, शल्य नाही केवळ' मात्र गात हा मंत्र चला

**"झपूर्झा ! गडे झपूर्झा !"**

'हरपले श्रेय' या कवितेत नेमके काय सांगायचे आहे हे स्पष्ट होत नाही. ही त्यांना सर्वच मिळाले त्यांना लौकिक आशा नव्हती कशाची तरी कमतरता त्यांनी एका स्त्री स्वरुपात मांडलेली आहे ते म्हणतात.

"त्रिखंड हिंडूनी धुडीअसे, न परी हरपले ते गवसे"

या कवितेमध्ये कवी निसर्गाचा आधार घेऊन हरपले श्रेय शोधण्याचा प्रयत्न करतात. शेवटी या टप्प्यावर येतात की निसर्ग सुद्धा मानवाला शांती समाधान देऊ शकत नाही. कवी शेवटी "तुझे नाम मुखी या कवितेत ईश्वराकडे भीक मागतात.

**"भिकारी या जगी इच्छित न मिळे काही म्हणून**

**तुझे पाय भिक्षाम देही !**

यातून त्यांनी त्यांची निराशा व्यक्त केली आहे आत्तापर्यंत त्यांनी कधीच ईश्वराकडे काही मागितले नाही. माथा टेकला नव्हता त्यांची वृत्ती ही सुधारणावादी विचारांची होती. इथे मात्र त्यांच्या मनाला निराशेने ग्रासले आहे. तरीही असे म्हणता येईल की कवी अध्यात्मवादी नव्हते. त्यांच्या एकूण कवितेत विविध विषय येतात व नवीन असे अभिव्यक्त करतात त्यांनी मराठी काव्यत विषयाचे, रचनेचे नावीन्य आणले नवनवीन रचना बंद रचले, इंग्रजीधर्तीच्या काव्यावर सुनीत हा प्रकार मराठीमध्ये आणला या दृष्टीने विचार करता त्यांची कविता वेगळी ठरते.

या बाबतीत असे म्हणता येईल की व्यक्तीच्या व्यक्तिस्वातंत्र्यावर बंडखोरीवर सौंदर्यवादी वाङ्मयाचा उगम आहे. या सौंदर्यवादाला अभिप्रेत असलेली अमर्याद आत्मनिष्ठा, आसुसलेली दृष्टी व सर्वच बंधनाचा तीटकारा, तरतमभाव, तादात्म्य, कलाकृतीवरील अपार श्रद्धा, कल्पकवृत्ती, मानवी मर्यादा बदलची हळहळ, निसर्गातील चैतन्याची जाणीव, साध्याही गोष्टीत मोठा आशय शोधण्याची दृष्टी, निष्ठा केशवसुतांच्या कवितेत प्रथमतः प्रकर्षाने प्रकटली आणि त्यांमुळेच त्यांची कविता वेगळी ठरली. या सर्व वेगळेपणामुळेच त्यांना अर्वाचीन मराठी काव्याचे जनकत्व दिल्या गेले. ते सार्थ ही आहे. त्यामुळेच त्यांच्या कार्याचा योग्यपणे गौरवही होईल.

* केशवसुतांची ची कविता ही पूर्वसुरीहून वेगळी आहे.
* त्यांच्या काव्यामध्ये विषयांची विविधता आहे.
* व्यक्ती काव्याचा विषय होऊ शकतो हे त्यांच्या कवितेचे ने प्रथम दाखवीले.
* सुनित हा काव्यप्रकार मराठीमध्ये आणण्याचे श्रेय केशवसुतांचे.
* केशवसुतांना सामाजिक क्रांती घडवून आणायची होती. जुने जाऊ द्या मरणालागुनी जाळूनी किंवा पुरुनी टाका !

## संदर्भ सूची :-

१) आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास - ल.रा.नशिराबादकर

२) आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास - अ.ना. देशपांडे

३) हरपले श्रेय - संपा. रा. श्री. जोग

४) केशवसुत आणि त्यांची कविता - न. श. रहाळकर